Diploma Programme
Programme du diplôme
Programa del Diploma

# Marathi A: literature – Standard level – Paper 1
# Marathe A : littérature – Niveau moyen – Épreuve 1
# Marathi A: literatura – Nivel medio – Prueba 1

Wednesday 4 May 2016 (afternoon)
Mercredi 4 mai 2016 (après-midi)
Miércoles 4 de mayo de 2016 (tarde)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

---

### Instructions to candidates

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a guided literary analysis on one passage only. In your answer you must address both of the guiding questions provided.
- The maximum mark for this examination paper is **[20 marks]**.

### Instructions destinées aux candidats

- N'ouvrez pas cette épreuve avant d'y être autorisé(e).
- Rédigez une analyse littéraire dirigée d'un seul des passages. Les deux questions d'orientation fournies doivent être traitées dans votre réponse.
- Le nombre maximum de points pour cette épreuve d'examen est de **[20 points]**.

### Instrucciones para los alumnos

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un análisis literario guiado sobre un solo pasaje. Debe abordar las dos preguntas de orientación en su respuesta.
- La puntuación máxima para esta prueba de examen es **[20 puntos]**.

2216 – 0599

4 pages/páginas

© International Baccalaureate Organization 2016

International Baccalaureate
Baccalauréat International
Bachillerato Internacional

https://xtremepape.rs/

कोणत्याही **एका** उता-याचे मार्गदर्शक प्रश्नांच्या आधारे वाङ्मयीन विश्लेषण लिहा. उत्तर लिहिताना दोन्ही मार्गदर्शक प्रश्न लक्षात घेणे आवश्यक आहे.

**1.**

मला घरून पोहायला जायची बंदी होती. कारण माझ्या पत्रिकेत मला पाण्यापासून भय आहे असं लिहिलं होतं. वडिलांचा पत्रिकेवर जबर विश्वास, आणि त्यांचा आम्हाला धाकही भरपूर. त्यामुळं समोरून वर्गातली मुलं पोहायला जात, पण मी नुसता पाहत बसे. मी डॉक्टरचा मुलगा होतो. वर्गातल्या गरीब मुलांपेक्षा कितीतरी वस्तू माझ्याकडं अधिक असायच्या. पण या बाबतीत मात्र या गरीब मुलांचा मला हेवा वाटत असे.

हळूहळू मी पोहोणं पाहायला जाऊ लागलो. मित्रांचे कपडे राखत बसायचो. डोहात दूर जांभळाचं झाड लोंबलेलं होतं. मित्र तिथं जाऊन जांभळं काढायचे, परत पोहत मला आणून द्यायचे. नदीकाठी शिंदाडाची झाडं होती. इतर ठिकाणच्या झाडांवरची शिंदाडं आली रे आली की आम्ही दगडं मारून पाडायचो. पिकायची कोणी वाट पाहायची नाही. पण डोहापलीकडची शिंदाडं मात्र झाडावर पिकत. ती पाडून मित्र मला आणून देत. कोणी कपडे धूत असला, कपड्यातला मळ पाण्यात गेला की छोटे छोटे मासे जमा होऊन गर्दी करत. त्याची गंमत पाहत बसे. एकदा मी चिपेवर बसलो असताना पाण्यातून मित्र तोंडानं आवाज न करता नुसते हातवारे करून माझ्या पायाशी बघायला सांगत होता. पायाशी पाहतो तो पाण्यातून एक साप पुढचा भाग बाहेर काढून बसलेला. मी जागीच थिजलो, पाय पटकन मागं घेऊ लागलो तो पायात गोळा आला. तेवढ्यात कसला तरी आवाज झाला आणि साप पाण्यात नाहीसा झाला. नंतर कळलं, ह्या सापाला विरुळा म्हणतात आणि तो बिनविषारी असतो. अतिशय भित्राही असतो. तेव्हा कुठं ताण कमी झाला.

नारायणगावहून अविनाश नावाचा मुलगा ओतूरला शिकायला आला. ओतूरच्या मानानं नारायणगाव म्हणजे शहरच. मी त्या आकर्षणानं त्याच्या नादी लागलो. आणि आमची चांगली गट्टी जमली. तो चांगला पोहोणारा होता. तो म्हणाला, "मी तुला शिकवतो पोहायला." माझं पोहायचं आकर्षणही जबरदस्त होत चाललं होतं. शेवटी मी पाण्यात उतरलो.

एका फडक्याची लंगोटी केली. पाण्यातून बाहेर आल्यावर एका आडबाजूच्या झाडावर ती वाळत टाकायची. दुसऱ्या दिवशी कपडे काढून लंगोटीवर पोहायला तयार. उथळ पाण्यात पाय आपटत बसायचो. चिपेजवळच्या डोहाची भीती वाटे. कारण त्याच्याविषयीच्या हकीगती डोळ्यांसमोर येत. चिपेच्या खाली कपार आहे, तिथं विशिष्ट जागी गेल्यास तिथला भोवरा आत ओढून घेतो; किंवा पाण्याखाली शिवाशिवी खेळताना चिपेच्या खालच्या दगडावर डोकं आपटून एक जण गेला होता, इत्यादी.

हळूहळू पोहायला शिकलो.

पण घरी कळू द्यायचं नाही, हे मोठंच कठीण होतं. कारण वडील मोठे चाणाक्ष. त्यांच्या नजरेतून काही सुटायचं नाही. असंच एकदा अविबरोबर पोहून परत येत होतो. वडील दारातच उभे होते. आत आल्यावर त्यांनी विचारलं,

"कुठं गेला होतास?"

मी घाबरत म्हटलं, "वेशीपाशी गेलो होतो. येताना हा भेटला."

"नदीवर नव्हता गेलास ना?"

"नाही."

वडिलांनी माझ्या केसांत हात घातला. ओलसर लागले. शर्ट वर करून करगोट्याला हात लावला. तो ओला होता. फाटकन कानफटात बसली. "बापाशी खोटं बोलतोस? लाज नाही वाटत? आम्ही काय मूर्ख आहोत? तुम्हांला पाण्यापासून धोका आहे. फार स्वत:चं डोकं चालवू नका!"

नंतर काही वेळानं आई मला एका बाजूला भेटली. म्हणाली, "पोहायला जातोस ना? जा. त्यांना कळू देऊ नको. पाण्यापासून भय आहे तर उलट पोहायला यायलाच हवं. फक्त जपून." मी माराचं सगळं दु:ख विसरलो.

अनलि अवचट, *जगण्यातलं काही* (२००८)

https://xtremepape.rs/

(अ) वरील उताऱ्यामधील प्रमुख आशयसूत्रांचा आविष्कार कशा रीतीने झाला आहे, याची चर्चा करा.

(ब) वरील उताऱ्यामध्ये निवेदनपद्धती आणि शैलीघटकांचा उपयोग कसा आणि कोणत्या पद्धतीने झाला आहे, असे म्हणता येईल?



https://xtremepape.rs/

**2.**

**प्रार्‌थना**

प्रभो, मज भेट
परंतु एकाच
मूर्तीमाजी साच
दिसू नको.

अनन्त गोचरीं
भरली ही सृष्टि
प्रत्येकांत दृष्टि
तुज बघो.

लाटांच्या नर्तनीं
पाऊस झडींत
ऐकू दे संगीत
प्रभो, तुझें.

भव्य हे गगन
क्षुद्र खाली तृण
दोहींत करुण—
रस तुझा.

अणुरेणूंमाजी
तुझीच विभूती
याची अनुभूती
मला देई.

वियोगाची भीती
वैराग्याची नीती
काही नसो चित्तीं
प्रीतीवीण.

वाटे तुझ्यावीण
मज नाही बळ
अन्तरीं विव्हळ
सदैव मी.

माधव ज्यूलियन, *समग्र माधव ज्यूलियन* (१९७७)

(अ) या कवितेतून सूचित होणाऱ्या भाववृत्तीच्या आविष्कारपद्धतीविषयी अभिप्राय द्या.

(ब) रचना आणि भाषेच्या संदर्भात कवीने या कवितेत उपयोगात आणलेली शैलीची तंत्रे कशी आणि कोणत्या पद्धतीने परिणाम साधतात? चर्चा करा.

https://xtremepape.rs/